| MHKO070011612015 | **नि.दि.दावा क्र.१८५/२०१५**<br>**बेबीजान महम्मद मुजावर वि. सकिना नबी खलिफा** |
|---|---|

## नि.क्र.५६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा दुरूस्ती कामी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सदर अर्जावरच नोंदवून योग्य तो आदेश पारीत करणेची विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, सदर कामातील प्रतिवादी नं.१ सकिना नबी खलिफा या दि.२९/०६/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना वादी नं.१ व प्रतिवादी नं.२ ते ४ हेच वारस असुन अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच प्रतिवादी नं.१ या मयत झाल्या असल्याने वारसा अर्ज मुदतीत असल्याने प्रतिवादी नं.१ च्या नावापुढे मयत असा शेरा मारुन सरनाम्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादीतर्फे त्यांचे वकीलांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे सदर अर्जावरच नोंदवून योग्य ते आदेश पारीत करणेविषयी विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |

२. काय आदेश? अंतिम आदेशान्वये

## कारण मिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता**

**५.** वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. **स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७–एस.सी. ११३** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे. वादीच्या अर्जातील कथीत दुरुस्ती पाहता वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी नं.१ चे नावासमोर मयत असा शेरा मारुन दुरुस्ती करणेची विनंती केली आहे.

**६.** वादीची प्रस्तावित दुरुस्तीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादीस अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादीस काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादीस कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदर दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्याच्या आत करावी.

३.   वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2024.11.18 17:16:41 +0530

**(अ.त्रिं.मनगिरे)**

दिनांक १८/११/२०२४    २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 18/11/2024. |
| Judgment/order signed by the PO on | 18/11/2024. |
| Judgment/order uploaded on | 18/11/2024. |